MHKO100009352022

## नियमीत दिवाणी दावा क्र. २२३/२०२२

शोभा भिमा चौगुले.
विरुध्द
कल्लाप्पा पोवाडी कांबळे वगैरे.

## निशाणी क्रमांक ५ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ प्रमाणे दाव्याचा अंतिम निर्णय होईपावेतो तुर्तातुर्त मनाई हुकुम मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी यांनी निशाणी क्र.१३ वर त्यांचा खुलासा दाखल केलेला आहे.

२. अर्ज व खुलाशाचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादींच्या वकीलांचे युक्तीवाद ऐकले. वादी व प्रतिवादींच्या परस्पर विरोधी कथनांवरुन खालील प्रश्न काढलेले असुन त्यावरील निष्कर्ष त्या खालील कारणमिमांसेच्या आधारे नोंदविलेले आहेत.

| अ.क्र. | प्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादींनी असे शाबीत केले काय की, त्यांच्या म्हणण्यात प्रथमदर्शनी तथ्य आहे ? | नाही. |
| २. | वादींनी पुढे असे शाबीत केले काय की, न्यायाचा समतोल त्यांच्या बाजुने आहे ? | नाही. |
| ३. | वादींनी पुढे असे शाबीत केले काय की, अर्ज मंजुर न केल्यास त्यांचे कधीही न भरुन येणारे नुकसान होईल ? | नाही. |
| ४. | आदेश काय ? | अर्ज नामंजुर करणेत येतो. |

## कारणमिमांसा

**दावा मिळकतींचे वर्णन-**

३. मौजे चंदनकुड, ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर येथील भूमापन गट क्र. ३७८ क्षेत्र ०० हेक्टर ४३ आर, पोट खराब ०० हेक्टर ०२ आर, एकूण क्षेत्र ०० हेक्टर ४५ आर, आकार ०१ रुपये १३ पैसे यापैकी पोट खराब क्षेत्र ०० हेक्टर ०२ आर ची शेतजमीन मिळकत ही दावा मिळकत होय. (यापुढे या मिळकतीस "दावा मिळकत" म्हणून संबोधण्यात येईल).

४. वादीने त्यांच्या कथनांच्या पुष्ट्यर्थ निशाणी क्र.३ व १८ येथे खालीलप्रमाणे कागदपत्रे दाखल केलेली आहेतः-

| अ.क्र. | तपशील |
|---|---|
| ०१. | दिनांक २३/०८/२०२२ रोजीचे वटमुखत्यारपत्र. |
| ०२. | गट क्र.३७८ चे नकाशाची प्रत. |
| ०३. | गट क्र.३७८ चा सन २०१८-१९ ते २०२०-२१ सालचा ७/१२ उतारा. |
| ०४. | खाते क्र.५६ चा सन २०२२-२३ सालचा ८-अ उतारा. |
| ०५. | गट क्र.३८३ चा सन २०१८-१९ ते २०२०-२१ सालचा ७/१२ उतारा. |
| ०६. | ग्रामपंचायत चंदनकुड यांचेकडील दिनांक २६/०७/२०२२ रोजीचे मासीक सभेतील ठरावाची प्रत. |
| ०७. | ग्रामपंचायत चंदनकुड यांचेकडील दिनांक ०५/०२/२०२० रोजीचे नोटीसीची प्रत. |
| ०८. | पंचायत समिती गडहिंग्लज यांनी दिनांक १४/०२/२०२० रोजी ग्रामपंचायत चंदनकुड यांना दिलेले पत्राची प्रत. |
| ०९. | ग्रामपंचायत चंदनकुड यांचेकडील दिनांक २०/०७/२०२२ रोजीचे पत्र. |
| १०. | वादी यांनी ग्रामपंचायत चंदनकुड यांना दिलेल्या अर्जाची प्रत. |
| ११. | वादी यांनी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गडहिंग्लज यांना दिलेल्या अर्जाची प्रत. |
| १२. | दिनांक ०५/०८/२०२२ रोजीचा ग्रामपंचायत चंदनकुड यांचेकडील लेखी जबाबाची प्रत. |
| १३. | दिनांक ०६/०५/२०२२ रोजीची नोटीस. |
| १४. | दिनांक २०/०५/२०२२ रोजीची रजि.ए.डी. नोटीस. |
| १५. | दिनांक ०५/०८/२०२० रोजीच्या साठेखताची प्रत. |

५. प्रतिवादी यांनी त्यांच्या कथनांच्या पुष्टयर्थ निशाणी क्र.१५ सोबत खालीलप्रमाणे कागदोपत्री पुरावा दाखल केलेला आहे.

| अ.क्र. | तपशील |
|---|---|
| ०१. | खाते क्र.११६ चा ९(३)९(४) चा उतारा. |
| ०२. | सर्व्हे क्र.१०४ चा फाळणी नकाशा. |
| ०३. | गट क्र.३७८ व ३८१ चा नकाशा. |
| ०४. | खाते क्र.५६ चा सन २०२२-२३ सालचा ८-अ उतारा. |
| ०५. | गट क्र.३७८ चा सन २०२० ते २०२२ सालचा ७/१२ उतारा. |

| | |
|---|---|
| ०६. | गट क्र.३७८ चे फेरफार पत्रक. |
| ०७. | फेरफार क्र.१४८८ चे फेरफार पत्रक. |
| ०८. | खाते क्र.६८३ चा ८-अ उतारा. |
| ०९. | गट क्र.३८३ चा सन २०१८ ते २०२० सालचा ७/१२ उतारा. |
| १०. | गट क्र.३८३ चा नकाशा. |
| ११. | दिनांक १८/०२/२०२२ रोजीचा तहसिलदार कार्यालय, गडहिंग्लज यांचेकडील निवाडा. |
| १२. | घर क्र.१८३ बाबत ग्रामपंचायत चंदनकुड यांचेकडील कर व फी बाबतच्या सन २०२१-२२, २०२२-२३ सालच्या पावत्या. |
| १३. | मालमत्ता क्र.१८३ चा असेसमेंट उतारा. |
| १४. | श्री. शिवशाहू शिक्षक शिक्षकेत्तर सेवकांची सह. पत संस्था यांचेकडील आकस्मिक व सामान्य कर्जाबाबतच्या पावत्या. |
| १५. | मिळकत क्र.१८३ मध्ये बांधलेल्या घराचे फोटो व त्याबाबतचे बिल. |
| १६. | शाखा व उप अभियंता गडहिंग्लज यांचेकडील प्रस्तावित रस्त्याचे कामाचा नकाशा. |
| १७. | दिनांक ०४/११/१९८७ रोजीचा शासन निर्णय. |

**<u>प्रश्न क्रमांक १ ते ३ करिताः</u> -**

६. वरील सर्व प्रश्न हे एकमेकांशी निगडीत असल्यामुळे अर्जातील कथनांची पुनरावृत्ती टाळण्याकरिता त्यांचेवर एकत्रीतपणे चर्चा करण्यात येत आहे. वादीच्या कथनाप्रमाणे, मिळकत गट क्र.३७८ ही संपूर्ण मिळकत वादीचे मालकीची असून प्रतिवादी यांचा सदर मिळकतीशी कसलाही मालकी हक्कसंबंध नव्हता व नाही. प्रतिवादी क्र.१ व २ हे दावा मिळकत शेत जमीन मिळकतीचे पश्चिम बाजूलगतचे धारक आहेत. सदर मिळकत गट क्र.३७८ मधून ग्रामपंचायतीचा रस्ता गेलेला असून सदर रस्त्याचे लगत असलेले क्षेत्र ०२ आर ही देखील वादीचे मालकीचे आहे. परंतु, वादी ही महिला असलेचा गैरफायदा घेत प्रतिवादी क्र.१ याने सदर क्षेत्रावर अतिक्रमण करुन घराचे बांधकाम केले आणि प्रतिवादी क्र.२ याने त्याचे लगत वादीचे मालकी कब्जेवहिवाटीत असलेल्या शेत जमीनीमध्ये अतिक्रमण करुन वापरत आहे. प्रतिवादी हे वादीचे मालकी हक्काची दावा मिळकत क्षेत्र ०२ आर ही लुबाडणेच्या उद्देशाने वादीस त्रास देत असून वादीचे शांततामय कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करीत आहेत आणि वादीस दावा मिळकतीमधून हूसकावून लावणेचा प्रयत्न करीत आहेत. प्रतिवादी क्र.३ ते ६ हे दावा मिळकतीचे लगतचे धारक असून ते

प्रतिवादी क्र.१ व २ यांना मदत करीत आहेत. त्यामुळे, प्रतिवादी यांचेविरुध्द त्यांनी वादीचे गट क्र.३७८ मध्ये असलेल्या शांततामय मालकी कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करु नये व वादीस त्यामधून हूसकावून लावू नये अशा मनाई आदेशाची विनंती केली.

७. याऊलट, प्रतिवादी यांनी कथन केले की, वादीने खोटा दावा दाखल केलेला असून दावा मिळकतीच्या चतुःसिमा नमुद केलेल्या नाहीत. तसेच, प्रतिवादी यांनी वादीचे मालकीच्या कोणत्याही मिळकतीमध्ये अतिक्रमण केलेले नाही. प्रतिवादी यांचे मालकीची मिळकत गट क्र.३८३ असून ती सदर वादीचे मालकीचे गट क्र.३७८ या मिळकतीलगत आहे. प्रतिवादींनी सदर त्यांचे मालकीची मिळकत गट क्र.३८३ मध्ये बांधकाम केलेले असून वादीचे मालकीचे मिळकतीमध्ये कोणतेही अतिक्रमण केलेले नाही. याऊलट, वादीचे मालकीची जमीन गट क्र.३७८ पैकी ०२ आर इतकी मिळकत ही प्रतिवादींनी वादीकडून दिनांक ०५/०८/२०२० रोजीच्या नोंदणीकृत दस्त क्र.१४७४ नुसार कायमस्वरुपी वहिवाटीकरीता रक्कम रु. २,५०,०००/- चे साठेखत करुन घेतलेले आहे. त्यानुसार, फेरफार क्र.१४८८ हा दिनांक १८/०१/२०२१ रोजी नोंद करणेत आलेला असून वादीने त्याबाबत अथवा साठेखताबाबत दाव्यात जाणूनबूजून कोठेही कथन केलेले नाही. त्यामुळे, वादी स्वच्छ हाताने न्यायालयासमक्ष आलेले नसल्यामुळे अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

८. दोन्ही बाजूंतर्फे करण्यात आलेला युक्तीवाद, कथन व दाखल दस्तऐवजांचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, मिळकत गट क्र.३७८ ही वादीचे मालकीची असून वादीने प्रतिवादी यांचेविरुध्द त्यांनी अतिक्रमण केले म्हणून स्थानिक संस्था ग्रामपंचायत, चंदनकुड यांचेकडे वेगवेगळे तक्रारी अर्ज दिलेले आहेत. तसेच, गट क्र.३८३ ही मिळकत प्रतिवादी यांचे मालकीची असून गट क्र.३७८ च्या नकाशानुसार सदर मिळकत ही गट क्र.३७८ मिळकती लगत आहे. तसेच, वादीने दस्तयादी निशाणी क्र.१८ वर दाखल नोंदणीकृत साठेखताप्रमाणे वादीने गट क्र.३७८ पैकी ०२ आर मिळकत ही प्रतिवादी क्र.१ यास विक्री करण्याचे साठेखत केलेले आहे. याशिवाय, प्रतिवादी तर्फे दाखल फेरफार क्र.१४८८ प्रमाणे गट क्र.३७८ पैकी २ आर मिळकत ही वादीने प्रतिवादी क्र.१ यांचे हक्कामध्ये साठेखत केले असल्यामुळे त्याबाबत नोंद करण्यात आली आहे.

९. सदर दाखल दस्त व दोन्ही बाजुंच्या कथनांवरुन वादी यांची मिळकत गट

क्र.३७८ व प्रतिवादी यांची मिळकत गट क्र.३८३ या मिळकती एकमेकांलगत असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. तसेच, वादीचे संपुर्ण कथनाचे अवलोकन केले असता वादीने प्रतिवादी यांनी तिचे मालकीचे गट क्र.३७८ पैकी ०२ आर क्षेत्रावर अतिक्रमण करुन बांधकाम केलेले असल्याचे कथन केल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. तसेच, वादी व प्रतिवादी क्र.१ यांचे दरम्यान सदर मिळकत गट क्र.३७८ पैकी ०२ आर क्षेत्राबाबत साठेखत झालेले असल्याचे देखील प्रथमदर्शनी दिसून येते. यावरुन, वादी व प्रतिवादी क्र.१ यांचे दरम्यान मिळकत गट क्र.३७८ पैकी ०२ आर क्षेत्राचे साठेखत झालेले असल्याचे व त्यांचे दरम्यान ०२ आर क्षेत्रात अतिक्रमण केल्याचे वाद आहे. त्यामुळे, याघडीला वादीने मागणी केलेप्रमाणे मनाई हुकूम देता येतो अथवा कसे हे पाहणे आवश्यक आहे.

१०. वादीने कथन केले आहे की, प्रतिवादी हे दावा मिळकत ०२ आर क्षेत्रावर वादीच्या कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करीत आहेत. तसेच, तिला त्यामधून हुसकावून लावणेचा प्रयत्न करीत आहेत. त्यामुळे, प्रतिवादीविरुध्द मनाई हुकूमाची विनंती केली. परंतु, सदर वादीचे संपुर्ण कथन पाहता असे दिसून येते की, एके ठिकाणी वादी असे कथन करते की, प्रतिवादी यांनी तिचे मालकीचे ०२ आर क्षेत्रामध्ये अतिक्रमण करुन बांधकाम केले आहे. तर, एके ठिकाणी असे कथन करते की, सदर मिळकतीवर तिच्या असलेल्या कब्जेवहिवाटीतस प्रतिवादी हरकत अडथळा करीत आहेत. सदर वादीचे कथन हे परस्पराविरोधी असून प्रतिवादी यांनी जर बांधकाम केले असल्यास त्यावर प्रतिवादींची कब्जेवहिवाट असणार आहे आणि जर वादीची वहिवाट असेल तर प्रतिवादी यांनी त्यावर बांधकाम केलेले नसणार आहे. त्यामुळे, सदर वादीचे परस्पराविरोधी कथनावर याठिकाणी अवलंबून राहून वादीचे कथनात प्रथमदर्शनी तथ्य असल्याचे दिसुन येत नाही.

११. याव्यतिरिक्त, वादीने तिचे दाव्यात असे कथन केले आहे की, दावा मिळकतीशी प्रतिवादींचा कोणताही हक्कसंबंध नाही. परंतु, स्वतः वादीनेच नि.१८ वरील दस्तयादी सोबत वादी व प्रतिवादी क्र.१ यांचे दरम्यान गट क्र.३७८ या मिळकतीपैकी ०२ आर मिळकतीचा साठेखत दाखल केले आहे. तसेच, वादीने नि.३ सोबत दाखल गट क्र.३७८ च्या ७/१२ उता-यावर इतर अधिकारात वादी व प्रतिवादी क्र.१ यांचे दरम्यान साठेखत झालेबाबत नोंद असल्याचे दिसून येते. यावरुन, वादी हीने दाखल केलेल्या

कागदपत्रांवरुन वादी व प्रतिवादी क्र.१ यांचे दरम्यान सदर मिळकतीबाबत व्यवहार झाल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. परंतु, वादीने सदर महत्वाच्या बाबीसंदर्भात तिचे दाव्यामध्ये कोठेही कथन केलेले नसुन सदर साठेखत देखील दाव्यासोबत दाखल न करता प्रतिवादींनी कैफियत दाखल केलेनंतर दाखल केलेले आहे. वादीने दाव्यात सदर साठेखताचे व्यवहाराबाबत व त्यासंदर्भात झालेल्या नोंदी बाबत तिला माहीती असतांना दाव्यात कथन केलेले नसल्याने प्रथमदर्शनी असे दिसून येते की, वादी ही तिचे व प्रतिवादी क्र.१ यांचे दरम्यान झालेले साठेखताबाबत व्यवहाराची बाब न्यायालयापासून लपविण्याचा प्रयत्न करीत आहे. त्यामुळे, अशा परिस्थितीमध्ये वादी ही स्वच्छ हाताने न्यायालयासमोर आलेली नसल्याने ती मनाईसारखा हुकूम मिळणेस पात्र नाही.

१२. याव्यतिरिक्त महत्वाची बाब म्हणजे वादीने दाव्यात दावा मिळकत म्हणुन गट क्र. ३७८ चे एकुण क्षेत्र ४५ आर पैकी केवळ ०२ आर क्षेत्राला दावा मिळकत म्हणुन सामील केलेले आहे. परंतु, प्रस्तुत अर्जान्वये संपुर्ण गट क्र.३७८ या मिळकतीबाबत मनाई हुकुमाची मागणी केलेली आहे. न्यायालयाकडुन मनाई हुकुम मागतेवेळी तो निश्चित कोणत्या मिळकतीबाबत आहे याचे ओळखीकरिता स्पष्ट व तपशिलवार वर्णन देणे महत्वाचे असते, जेणेकरुन प्रतिवादींविरुध्द सदर निश्चित मिळकतीकरिता मनाई हुकुम देता येईल. परंतु, प्रस्तुत प्रकरणात वादीने दावा मिळकत म्हणुन गट क्र.३७८ पैकी ०२ आर क्षेत्र सामील केलेले असुन मनाई हुकुम हा संपुर्ण गट क्र.३७८ बाबत मागितलेला आहे. अशा परिस्थितीत ज्या मिळकतीकरिता मनाई हुकुम मागितलेला आहे ती मिळकत स्पष्टपणे नमुद नसल्याने त्याबाबत प्रतिवादींविरुध्द मनाई हुकुम देता येणार नाही.

१३. याव्यतिरिक्त, ज्यावेळी वादी ही प्रतिवादी व तिची मिळकत एकमेकांलगत असुन प्रतिवादी हे अतिक्रमण करुन हरकत अडथळा करीत असल्याचे कथन करुन त्यांचेविरुध्द मनाईची दाद मागणी करते. त्यावेळी वादीने प्रथमदर्शनी तिची केस शाबीत करणेकामी दावा मिळकतीचे निश्चित वर्णन म्हणजे लांबी व रुंदी नमुद करणे आवश्यक असते. जेणेकरुन दावा मिळकतीचे वर्णन हे स्पष्ट होईल आणि त्यावर अतिक्रमण करुन प्रतिवादी हे हरकत अडथळा करीत आहेत अथवा कसे हे ठरविता येईल. परंतु, वादीने दाव्यामध्ये अथवा दावा मिळकतीच्या वर्णनामध्ये दावा मिळकतीची निश्चित लांबी व रुंदी नमुद केलेली नाही. तसेच, वादीने स्वतःच्या मिळकतीची व प्रतिवादीच्या मिळकतीची

लांबी व रुंदी स्पष्टपणे कथन केलेली नसल्यामुळे आणि दोन्ही मिळकती एकमेकांलगत असल्यामुळे या घडीला वादीतर्फे दाखल पुराव्यावरुन प्रथमदर्शनी प्रतिवादी यांनी अतिक्रमण करुन वादीचे कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा केला आहे अथवा कसे हे स्पष्ट होत नाही.

१४. एकंदरित वर नमुद विवेंचनानुसार वादीच्या कथनामध्ये प्रथमदर्शनी तथ्य असल्याचे दिसून येत नाही. तसेच, प्रथमदर्शनी वादी व प्रतिवादी क्र.१ यांचे दरम्यान दावा मिळकत गट क्र. ३७८ पैकी ०२ आर मिळकतीबाबत साठेखत झालेले असताना व त्याअनुषंगाने महसूल दप्तरी नोंद झालेली असताना प्रतिवादी यांचेविरुध्द मनाई हुकुम दिल्यास प्रतिवादींचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. याउलट, वर नुमदप्रमाणे अर्ज मंजूर न केल्यास वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. म्हणून माझे मते न्यायिक समतोल हा वादीच्या लाभात नाही. सबब मी प्रश्न क्र.१ ते ३ चे नकारार्थी उत्तर देत आहे.

**<u>प्रश्न क्रमांक ४ करीताः</u>**-

१५. मुद्दे क्र.१ ते ३ चे निष्कर्षाचा व वरील सर्व कारणांचा विचार करता सदरचा अर्ज नामंजुर होण्यास पात्र आहे. करिता प्रश्न क्रमांक ४ चा निष्कर्ष नोंदविण्यासाठी मी पुढील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज नामंजुर करण्यात येत आहे.

२. अर्जाचा खर्च दाव्यात समाविष्ठ करण्यात यावा.

(खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला)

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by SUJIT AMBADAS RATHOD
Date: 2023.05.04 13:57:04 +0530

दिनांकः ०२/०५/२०२३.
गडहिंग्लज.

**( एस.ए.राठोड )**
२रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
गडहिंग्लज.

I affirm that the contents of this P.D.F file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of stenographer | R.D.Patil. |
| Name of Court | S.A.Rathod,<br>2nd Jt. Civil Judge Jr. Dvn. and Judicial Magistrate First Class, Gadhinglaj. |
| Date of Dictation | 02/05/2023 |
| Order signed by P.O. on | 02/05/2023 |
| Order uploaded on | 04/05/2023 |